

डॉ. संजयजी भारती स्मृति राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन
वक्तृत्व स्पर्धा - २०२५ बक्षीस वितरण सोहळा



कोषाध्यक्ष मा. प्रियदर्शनजी भारती यांचे उपस्थितीत
पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ वर्ष २०२४-२५

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित
श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, आर्णी द्वारा संचालित

# स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय,

महाळूंगी रोड, आर्णी, जि.यवतमाळ

NAAC मुल्यांकनाद्वारे "B" श्रेणी प्राप्त

## कला, वाणिज्य व विज्ञान शाखा

Website : www.smdb.ac.in Email ID : lrboff418@gmail.com Contact No.: 07234-295468
Facebook Page ID : http://www.facebook.com/smdb418
Instragram Page ID : https://www.instagram.com/bharti_clg_arni/

## नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार उपलब्ध सुविधा

- स्वच्छ हिरवागार विस्तीर्ण परिसर
- उच्चविद्याविभूषित अनुभवी शिक्षकवृंद
- करीअर कट्टा
- WiFi/इंटरनेट सुविधा
- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
- सी.सी.टी.व्ही.कॅमेरा व्यवस्था
- Botanical Garden
- विविध खेळासाठी साहित्य सुविधा व विस्तीर्ण मैदान
- शुद्ध शितल जल
- विविध क्षेत्रातील नामवंत संस्थांशी सामंजस्य करार (MoU)
- Event Hoisting and Comparing प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र
  Junior Software Developers Course and I.T. Coordinators of School Course
- आधुनिक संशोधन प्रयोगशाळा Ph.D.Research Centre
- संगणकीकृत ग्रंथालय
- शैक्षणिक/अभ्यास सहल
- अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- स्मार्ट क्लासरुम/डिजीटल सेमिनार हॉल
- कमवा व शिका योजना
- Vermicompost Project
- महिला सामान्य कक्ष (वेन्डींग मशीनसह)
- Tally प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- Medicinal Plants : Traditional uses and Career Opportinuties प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- English communication for Work Place and Business प्रमाणपत्र अभ्यासक्रम
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र

# माहिती पुस्तिका

सन २०२५-२६

प्रकाशक
प्राचार्य डॉ.एन.ए.पिस्तुलकर




राष्ट्रीय परिषद – २०२५ ला संबोधित करतांना संस्थेच्या अध्यक्षा मा.डॉ. किरणताई सं. भारती, कुलगुरु मा.डॉ.विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, ILA अध्यक्ष मोहन खेरडे



गणतंत्र दिनानिमित्य विद्यार्थ्यांना संबोधित करतांना संस्थेचे सचिव सन्माननीय ॲड. सिद्धार्थजी सं. भारती



वार्षिक स्नेहसम्मेलन प्रसंगी आयोजित "कबड्डी स्पर्धा"




जिल्हास्तरीय "अविष्कार – २०२४" चे प्रथम पारितोषिक स्वीकारतांना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी




"जागतीक एड्स दिन" निमित्त "जनजागृती रॅली"



रा.से.यो. द्वारे आयोजित "बेटी बचाव बेटी पढाओ" अभियान

**श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, आर्णी**
(स्थापना १९३२)

## संचालक मंडळ

१. डॉ. किरणताई सं. भारती ......... अध्यक्ष
२. श्री. समृद्ध सं. भारती ............. उपाध्यक्ष
३. श्री. प्रियदर्शन रा. भारती .......... कोषाध्यक्ष
४. ॲड. सिद्धार्थ संजय भारती ....... सचिव
५. श्री. मनोज पां. माहुरे ............. सहसचिव
६. सौ. आशाताई प्रि. भारती......... सदस्य
७. कु. नुतन रा. भारती............... सदस्य
८. श्री. गिरधारीलाल छ. राठी ....... सदस्य
९. डॉ. शशिकांत व. वानखडे ........ सदस्य

## संस्थेद्वारा संचालित शाळा, महाविद्यालय व वसतीगृह

* स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी
* यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, आर्णी
* श्री. म. द. भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आर्णी
* श्री. म. द. भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक कन्या विद्यालय, आर्णी
* श्री. म. द. भारती माध्यमिक विद्यालय, गांधीनगर, आर्णी
* श्री. म. द. भारती प्राथमिक विद्यालय, गांधीनगर, आर्णी
* पोतदार इंटरनॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुल, आर्णी
* श्री. म. द. भारती पूर्व प्राथमिक इंग्रजी माध्यम विद्यालय, गांधीनगर, आर्णी
* श्री. म. द. भारती मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, आर्णी
* श्री. म. द. भारती मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, आर्णी





# प्रस्तावना

यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देण्यासाठी श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष तथा संस्थेचे शिल्पकार स्व. राजकमलजी भारती यांनी सन १९८४ मध्ये आर्णी येथे श्री.म.द.भारती कला वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष स्व. डॉ. संजयजी रा. भारती यांनी आधुनिक काळातील विज्ञान व तंत्रज्ञानाची गरज ओळखून सन २००९-१० या शैक्षणिक सत्रापासून महाविद्यालयात विज्ञान शाखा सुरु केली आहे. मागील ४० वर्षापासून या महाविद्यालयात आर्णी परिसरातील शेतकरी, शेतमजुर, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास वर्गातील असंख्य विद्यार्थी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी पर्यंतचे शिक्षण घेत आहेत. महाविद्यालय विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम सातत्याने राबवीत असते. परिणामतः विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, व्यक्तिमत्व विकास व सामाजिक मुल्यांची रुजवण होते. सद्यस्थितीत महाविद्यालयाचे नामकरण स्व.राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय असे झालेले आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयाने विविध क्षेत्रातील नामवंत संस्थांशी सामंजस्य करार केलेले आहेत. ज्यांच्या माध्यमातून तज्ज्ञांचे मार्गदर्शन प्राप्त होत असल्याने आज अनेक विद्यार्थ्यांनी नोकरी, व्यवसाय व संशोधन क्षेत्रात यश संपादन केले आहे.

शासनाच्या सुचनेनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार महाविद्यालयातील सर्व प्रवेश ''**नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसारच**'' करण्याचे महाविद्यालयाने ठरविलेले आहे. याचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये निर्माण करण्यासाठी होईल. शिकत असतांना विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांचे On Job Training सुद्धा महाविद्यालयामार्फत देण्यात येईल.

**विद्यार्थ्यांनी या माहितीपत्रकाचे काळजीपूर्वक वाचन करुन प्रवेश अर्ज भरावे.**

# VISION & MISSION

## VISION

**''विद्या अमृतम् अश्नुते''**

Which broadly implies that knowledge uplifts those who grope in ignorance, and guides them towards the right path of bright future.

## MISSION

Raise academic, social and cultural standard of the students from rural and tribal area and to bring them in the main stream of education.

## AIMS & OBJECTIVES

### (महाविद्यालयाची उद्दिष्ट्ये)

- नवीन राष्ट्रीयशैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रम सर्व सोयीयुक्त इमारत व परिसर
- विद्यापीठस्तरीय शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्व सोयी-सुविधा कमी खर्चात उपलब्ध करुन देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांच्या विकासाच्या दृष्टीने निरनिराळ्या योजना तयार करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व सांस्कृतिक जाणीव निर्माण करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये सेवावृत्ती, देशभक्ती व सवधर्मसमभाव रुजवणे.
- कौशल्य आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रमाद्वारे रोजगार व स्वययंरोजगार निर्मितीसाठी विद्यार्थी सक्षम करणे.
- विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमतत्त्वाचा सर्वांगिण विकास करुन चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- आर्थिक अतिदुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे.
- विद्यार्थ्यांमध्ये संगणकशात्र व माहिती तंत्रज्ञानाची आवड निर्माण करणे.
- परिसरातील विद्यार्थ्यांकरिता कला, वाणिज्य व विज्ञान शाखेत पदव्युत्तर शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे.
- संशोधनाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अद्यावत संशोधन केंद्राची सुविधा.
- विद्यार्थ्यांच्या अद्यावत ज्ञान संपादनासाठी उत्कृष्ट ग्रंथसंपदा, वर्तमानपत्रे, रोजगार वातापत्रे, नियतकालिके, मासिके, अद्यावत माहितीस्त्रोतांनीयुक्त असे प्रशस्त, समृद्ध ग्रंथालय व्यवस्था.





सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात शासनाचे **''राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०'' व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती** द्वारे **प्राप्त निर्देशाप्रमाणे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करुन** पुढीलप्रमाणे अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जाईल

**UNDERGRADUATE DEGREE PROGRAMME (As per NEP - 2020)**

**For Faculty of SCIENCE AND TECHNOLOGY (SCIENCE Group)**

**''विज्ञान व तंत्रज्ञान शाखा (विज्ञान गट)''**

| Program level & Eligibility | Major (Core) Subjects with code (which can be opted) प्रमुख (कोअर) विषय, त्यांच्या कोडसह दिलेले आहेत, जे पदवी अभ्यासक्रमामध्ये निवडले जाऊ शकतात. | |
|---|---|---|
| B.Sc. I<br>4.5 (120 Seats)<br>The students passing H.S.S.C. Examination | **Group A**<br>Zoology प्राणिशास्त्र (133)<br>Chemistry रसायनशास्त्र (120)<br>Botany वनस्पतीशास्त्र (107) | **Group B**<br>Computer Science संगणकशास्त्र (122)<br>Chemistry रसायनशास्त्र (120)<br>Mathematics गणितशास्त्र (126)<br>Physics भौतिकशास्त्र (129) |
| | विद्यार्थ्याने वरीलपैकी (Group A किंवा Group B) मधूनच एक विषय प्रमुख (Major) विषय म्हणून निवडावा व दुसरा एक विषय दुय्यम विषय (Minor) म्हणून निवडावा. (अट : पात्रता परिक्षा विद्यार्थी त्या ग्रुपमधील विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.) | |

**B.Sc.-I Sem-1 विद्यार्थ्याने वरील Major व Minor विषयांच्या व्यतिरिक्त खालील कोर्सेसची निवड करणे आवश्यक आहे.**

- **G/OEC (Generic/Open Elective Course)** हा विज्ञान शाखेव्यतिरिक्त इतर शाखेच्या (कला शाखा, वाणिज्य शाखा) च्या **Basket** (अभ्यासक्रमांचा संच) मधून घ्यावा. त्याकरिता विद्यार्थ्याला जो विषय घ्यायचा आहे त्या विषयाच्या विषय शिक्षकांची मदत घ्यावी.
- **SEC (Skill Enhancement Course)** (कौशल्याभिमुख अभ्यासक्रम)
- **i) AEC (Ability Enhancement Courses) Focus: linguistic communication** (भाषिक संवाद कौशल्ये) **ii) IKS (Indian knowledge system)** (भारतीय ज्ञान प्रणाली), **iii) VEC (Value Education Courses)**
- **CC (Co-curricular courses)** उदा. योग शिक्षण, खेळ, फिटनेस/शरीरसौष्ठव, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना

**ADMISSION AT A GLANCE** (विद्यार्थ्यांना एकंदरीत पुढीलप्रमाणे विषय घ्यायचे आहेत.)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **B.Sc.-I** | Sem-1 | Major | Minor | G/OEC | SEC | AEC/IKS/VES | CC |
| **B.Sc.-I** | Sem-2 | Major | Minor | G/OEC | SEC/VSEC | AEC/VES | CC |

विषय निवडीच्या संदर्भात कुठलीही अडचण असल्यास संपर्कासाठी पान क्र.७ वर विज्ञान शाखेच्या प्राध्यापकांची नावे व मोबाईल नंबर दिलेले आहेत, त्यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **B.Sc. II 5.0 (120 Seats)** | **As per Guidelines of NEP-2020 and the notification of Sant Gadge Baba Amravati University Amravati** |
| **B.Sc. III (120 Seats)** | **As per CBCS norms of Sant Gadge Baba Amravati University Amravati** |

## For Faculty of HUMANITIES (Art Group)
## "मानव्यशास्त्र विभाग (कला शाखा)"

| Program level & Eligibility | Any three Subjects with code (which can be opted) विद्यार्थ्यांनी कोणतेही तीन विषय व त्यांच्या सांकेतीक क्रमांकासह निवडावे. | |
|---|---|---|
| B.A. I 4.5 (120 Seats Aided) (100 Seats Non aided) The students passing H.S.S.C. Examination | Economics अर्थशास्त्र (613) | Marathi Language मराठी भाषा (639) |
| | English Language इंग्रजी भाषा (615) | Marathi Literature मराठी वाड्मय (640) |
| | History इतिहास (629) | Political Science राज्यशास्त्र (650) |
| | Home Economics गृहअर्थशास्त्र (630) | Sociology समाजशास्त्र (126) |
| | विद्यार्थ्याने वरीलपैकी तीन विषय निवडावे. | |

**B.A.- I Sem-1 विद्यार्थ्याने वरीलपैकी तीन विषयांच्या व्यतिरिक्त खालील कोर्सेसची निवड करणे आवश्यक आहे.**

- **G/OEC (Generic/Open Elective Course)** हा कला शाखेव्यतिरिक्त इतर शाखेच्या (विज्ञान शाखा, वाणिज्य शाखा) च्या **Basket** (अभ्यासक्रमांचा संच) मधून घ्यावा. त्याकरिता विद्यार्थ्याला जो विषय घ्यायचा आहे त्या विषयाच्या विषय शिक्षकांची मदत घ्यावी.
- **SEC (Skill Enhancement Course)** (कौशल्याभिमुख अभ्यासक्रम)
- **i) AEC (Ability Enhancement Courses) Focus: linguistic communication** (भाषिक संवाद कौशल्ये) **ii) IKS (Indian knowledge system)** (भारतीय ज्ञान प्रणाली), **iii) VEC (Value Education Courses)**
- **CC (Co-curricular courses)** उदा. योग शिक्षण, खेळ, फिटनेस/शरीरसौष्ठव, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना

**ADMISSION AT A GLANCE** (विद्यार्थ्यांना एकंदरीत पुढीलप्रमाणे विषय घ्यायचे आहेत.)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **B.A.-I** | Sem-1 | Sub-1 | Sub-2 | Sub-3 | G/OEC | SEC | AEC/IKS/VES | CC |
| **B.A.-I** | Sem-2 | Sub-1 | Sub-2 | Sub-3 | G/OEC | SEC/VSEC | AEC/VES | CC |

विषय निवडीच्या संदर्भात कुठलीही अडचण असल्यास संपर्कासाठी पान क्र.८ वर कला शाखेच्या प्राध्यापकांची नावे व मोबाईल नंबर दिलेले आहेत, त्यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **B.A. II 5.0 (120 Seats)** | **As per Guidelines of NEP-2020 and the notification of Sant Gadge Baba Amravati University Amravati** |
| **B.A. III (120 Seats)** | **As per CBCS norms of Sant Gadge Baba Amravati University Amravati** |





## For Faculty of COMMERCE (Commerce Group)
## "वाणिज्य शाखा (वाणिज्य विभाग)"

| Program level & Eligibility | Major (Core) Subjects with code (which can be opted) all Compulsory for Sem - I |
|---|---|
| B.Com. I 4.5 (120 Seats) The students passing H.S.S.C. Examination | Financial Accounting "वित्तीय लेखाशास्त्र" (400100)<br>Indian Contract Act 1 "भारतीय करार अधिनियम 1" (400101)<br>Dynamics of Management "व्यवस्थापनाचे गतीशास्त्र" (400102)<br>Micro Economics 1 "सुक्ष्म अर्थशास्त्र 1" (400103) |
| | विद्यार्थ्याने वरील विषय निवडावे. |

**B.Com.- I Sem-1 विद्यार्थ्याने वरील विषयांच्या व्यतिरिक्त खालील कोर्सेसची निवड करणे आवश्यक आहे.**

- **G/OEC (Generic/Open Elective Course)** हा वाणिज्य शाखेव्यतिरिक्त इतर शाखेच्या (कला शाखा, विज्ञान शाखा) च्या **Basket** (अभ्यासक्रमांचा संच) मधून घ्यावा. त्याकरिता विद्यार्थ्याला जो विषय घ्यायचा आहे त्या विषयाच्या विषय शिक्षकांची मदत घ्यावी.
- **SEC (Skill Enhancement Course)** (कौशल्याभिमुख अभ्यासक्रम)
- **i) AEC (Ability Enhancement Courses) Focus: linguistic communication** (भाषिक संवाद कौशल्ये) **ii) IKS (Indian knowledge system)** (भारतीय ज्ञान प्रणाली), **iii) VEC (Value Education Courses)**
- **CC (Co-curricular courses)** उदा. योग शिक्षण, खेळ, फिटनेस/शरीरसौष्ठव, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना

**ADMISSION AT A GLANCE** (विद्यार्थ्यांना एकंदरीत पुढीलप्रमाणे विषय घ्यायचे आहेत.)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **B.Com.-I** | Sem-1 | Sub-1 | Sub-2 | Sub-3 | Sub-4 | G/OEC | SEC | AEC/IKS/VES | CC |
| **B.Com.-I** | Sem-2 | Sub-1 | Sub-2 | Sub-3 | Sub-4 | G/OEC | SEC/VSEC | AEC/VES | CC |

विषय निवडीच्या संदर्भात कुठलीही अडचण असल्यास संपर्कासाठी पान क्र.९ वर वाणिज्य शाखेच्या प्राध्यापकांची नावे व मोबाईल नंबर दिलेले आहेत, त्यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **B.Com. II 5.0 (120 Seats)** | **As per Guidelines of NEP-2020 and the notification of Sant Gadge Baba Amravati University Amravati** |
| **B.Com. III (120 Seats)** | **As per CBCS norms of Sant Gadge Baba Amravati University Amravati** |

## Basket of Generic / Open Elective Courses (G/OEC) Under NEP 2020 (UG)
## "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०" अंतर्गत (स्नातक पातळीवर) निवडण्यासाठी उपलब्ध सामान्य/खुल्या अभ्यासक्रमांचे संच

### Programme For B.A. I, Sem-I & B.Com. I, Sem-I
### "बी.ए. प्रथम वर्ष सत्र–I आणि बी.कॉम. प्रथम वर्ष सत्र–I साठी"

**अत्यंत महत्त्वाचे :** बी.ए.भाग–१ व बी.कॉम.भाग–१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांनी खालीलपैकी कोणतेही एका विषयाचे दोन कोर्स निवडावेत आणि संबंधित विषयाच्या विभाग प्रमुखांशी स्वत: संपर्क साधून नाव नोंदणी करावी.

### FACULTY OF SCIENCE & TECHNOLOGY विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा

| Sr.No. अनु.क्र. | Discipline Subject विद्याशाखेतील विषय | Course Code अभ्यासक्रम सांकेतांक | Title शीर्षक |
|---|---|---|---|
| 01 | Physics - **भौतिकशास्त्र** (Code-129) **विभाग प्रमुख** (HOD) : **डॉ. प्रतीक वानखडे** **मो.** 8805291883 | 129/OE-1 | Space Science **अंतराळ विज्ञान** |
| | | 129/OE-2 | Non-conventional Energy Sources **अपारंपरिक ऊर्जा स्रोत** |
| 02 | Chemistry - **रसायनशास्त्र** (Code-108) **विभाग प्रमुख** (HOD) : **प्रा. संतोष आराडे** **मो.** 9922490601 | 108202 | Chemistry in Everyday Life **दैनंदिन जीवनातील रसायनशास्त्र** |
| | | 108203 | Pollution & Remedies **प्रदूषण आणि उपाय** |
| 03 | Zoology - **प्राणीशास्त्र** (Code-133) **विभाग प्रमुख** (HOD) : **प्रा. डॉ. प्रशांत आवते** **मो.** 9423120223 | 133203 | Economics Zoology **आर्थिक प्राणीशास्त्र** |
| | | 133204 | Wildlife Ecotourism **वन्यजीव नैसर्गिक पर्यटन** |
| 04 | Botany - **वनस्पतीशास्त्र** (Code-107) **विभाग प्रमुख** (HOD) : **डॉ. मनोज काकपुरे** **मो.** 9890938956 | 107203 | Plant Health Care **वनस्पतीच्या आरोग्याची काळजी** |
| | | 107204 | Kitchen Gardening **परसबाग बागकाम** |
| 05 | Mathematics - **गणितशास्त्र** (Code-126) **विभाग प्रमुख** (HOD) : **प्रा. अमित बागडे** **मो.** 9370661002 | 126200 | Algebra and Calculus **बीजगणित आणि कॅल्क्युलस** |
| | | 126201 | Algebra and Calculus (Lab) **बीजगणित आणि कॅल्क्युलस** |





### Programme For B.Sc. I, Sem-I & B.Com. I, Sem-I
### "बी.एस्सी. प्रथम वर्ष सत्र–I आणि बी.कॉम. प्रथम वर्ष सत्र–I साठी"

**अत्यंत महत्त्वाचे :** बी.एस्सी. भाग–१ व बी.कॉम.भाग–१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांनी खालीलपैकी कोणतेही एका विषयाचे दोन कोर्स निवडावेत आणि संबंधित विषयाच्या विभाग प्रमुखांशी स्वत: संपर्क साधून नाव नोंदणी करावी.

### FACULTY OF HUMANILIES कला विद्याशाखा

| Sr.No. अनु.क्र. | Discipline Subject विद्याशाखेतील विषय | Course Code अभ्यासक्रम सांकेतांक | Title शीर्षक |
|---|---|---|---|
| 01 | History - **इतिहास** (Code-629) **विभाग प्रमुख** (HOD) : **डॉ. विजय टोकसे** **मो.** 9665113644 | 629203 | History of Saint and Social reformer of Vidarbha **विदर्भातील संत आणि सामाजिक सुधारणांचा इतिहास** |
| | | 629202 | History of Saint and Social reformer of Maharashtra **महाराष्ट्रातील निवडक सामाजिक सुधारणांचा इतिहास** |
| 02 | Marathi - **मराठी** (Code-639) **विभाग प्रमुख** (HOD) : **प्रा. उदयसिंह चव्हाण** **मो.** 9764874083 | 639251 | Marathi bhasha v Vyakran **मराठी भाषा व व्याकरण** |
| | | 639252 | Marathi bhasha v Vyakran **मराठी भाषा व व्याकरण** |
| 03 | Home Ecnomics - **गृहअर्थशास्त्र** (Code-630) **विभाग प्रमुख** (HOD) : **डॉ. मनीषा क्षीरसागर** **मो.** 9970371515 | 630261 | Event Management **कार्यक्रम व्यवस्थापन** |
| | | 630162 | Budget Drafting and Saving **बजेट मसुदा तयार करणे व बचत** |

**Programme For B.Sc. I, Sem-I & B.A. I, Sem-I**

**"बी.एस्सी. प्रथम वर्ष सत्र–I आणि बी.ए. प्रथम वर्ष सत्र–I साठी"**

**अत्यंत महत्त्वाचे :** बी.एस्सी. भाग–१ व बी.ए.भाग–१ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांनी खालीलपैकी कोणतेही एका विषयाचे दोन कोर्स निवडावेत आणि संबंधित विषयाच्या विभाग प्रमुखांशी स्वत: संपर्क साधून नाव नोंदणी करावी.

**FACULTY OF COMMERCE वाणिज्य शाखा**

| Sr.No. अनु.क्र. | Discipline Subject **विद्याशाखेतील विषय** | Course Code **अभ्यासक्रम सांकेतांक** | Title **शीर्षक** |
|---|---|---|---|
| 01 | Commerce - **वाणिज्य** (Code-400) **विभाग प्रमुख** (HOD) **:** **डॉ. विनीत माहुरे** **मो.** 9404235349 | 400104 | Introduction to Share Market **शेअर मार्केटचा परिचय** |
| | | 400105 | Introduction to Accounting **लेखा परिचय** |

**Knowledge Resource Centre (Library)**

महाविद्यालयाचे ग्रंथालय अद्ययावत असून समृद्ध असा वाचन कक्ष आहे. ग्रंथालयात सुमारे ९००० विविध विषयांवरील पुस्तके आहेत. वाचन कक्षात वर्तमानपत्रे, स्पर्धा परीक्षांची व विविध विषयांची मासिके, नियतकालिके उपलब्ध असतात. ग्रंथालय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या ग्रंथालयाशी संलग्न असून तेथील स्पर्धा परीक्षांची पुस्तके, मासिके, नियतकालिकांचा लाभ घेता येतो. ग्रंथालयीन सेवा संगणकीकृत असून संगणक कक्षात इंटरनेट, Wifi सेवा दिल्या जाते. N-List व National Digital Library च्या माध्यमातून हजारो ई–जर्नल्स आणि ई–बुक्स उपलब्ध केली जातात. अंकुर स्टडी सर्कल, करिअर कट्टा द्वारे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा बाबत अभ्यासवर्ग आणि मार्गदर्शन, सराव परीक्षा घेतल्या जातात.

अधिक माहितीसाठी संपर्क – ग्रंथालय विभाग प्रमुख
**प्रा.डॉ.एस.व्ही.वानखडे,** मो. 9423290402





# स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय

## महाळूंगी रोड, आर्णी, जि. यवतमाळ

**प्राध्यापक वर्ग (Teaching Faculty)**

| अ.क्र. | नाव | शिक्षण | विषय |
|---|---|---|---|
| १) | डॉ.एन.ए.पिस्तुलकर प्राचार्य | M.A. (ECO, POL.SCI) M.Phil., PhD | अर्थशास्त्र |
| २) | प्रा. डॉ. एस. व्ही. वानखडे ग्रंथालय विभाग प्रमुख | M.COM., MLIB, SET, PhD | ग्रंथालय |
| ३) | प्रा. डॉ. व्ही. आर. माहुरे | M.COM., M.Phil., PhD | वाणिज्य |
| ४) | प्रा. एस. एन. बोळे | M.A. (ENG) M.Phil. | इंग्रजी |
| ५) | प्रा. एम. एम. पांडे | M.A. (ENG) M.Phil. | इंग्रजी |
| ६) | प्रा. यू. डी. चव्हाण | M.A. (MAR) M.Phil. | मराठी |
| ७) | प्रा. डॉ. बी. एस. शेलकर | M.A. (SOC) M.Phil. PhD | राज्यशास्त्र |
| ८) | प्रा. डॉ. व्ही. आर. टोकसे | M.A. (HIS) NET, PhD | इतिहास |
| ९) | प्रा. डॉ. पी. जे. आवते | M.Sc. (ZOO), B.Ed., PhD | प्राणीशास्त्र |
| १०) | प्रा. डॉ. एस.एम. आराडे | M.Sc. (CHE) NET, SET | रसायनशास्त्र |
| ११) | प्रा. डॉ. एम. आर. काकपुरे | M.SC. (BOT), PhD | वनस्पतीशास्त्र |
| १२) | प्रा. पी. आर. भोकरे | M.Sc. (CHE) NET, GATE | रसायनशास्त्र |
| १३) | प्रा. डॉ. आर. पी. टेकाडे | M.Sc. (ZOO), M.Phil., B.Ed., PhD | प्राणीशास्त्र |

| | | | |
|---|---|---|---|
| १४) | प्रा. डॉ. डी.पी. देशमुख | M.Sc. (PHY), M.Phil., PhD | भौतिकशास्त्र |
| १५) | प्रा. डॉ. पी. एम. वानखडे | M.Sc. (PHY), M.Phil., PhD | भौतिकशास्त्र |
| १६) | प्रा. डॉ. यू. ए. मोरे | M.Sc. (BOT), PhD | वनस्पतीशास्त्र |
| १७) | प्रा. ए. एस. मुनेश्वर | M.Sc. (BOT), NET | वनस्पतीशास्त्र |
| १८) | प्रा. डॉ. जे. एस. कौसल्ये | M.Sc. (PHY, MATHS), PhD | भौतिकशास्त्र |
| १९) | प्रा. पी. एन. सोनाने | M.Sc. (PHY), NET | भौतिकशास्त्र |
| २०) | प्रा. ए. एम. बागडे | M.Sc. (MATHS), NET | गणित |

**याशिवाय विषयानुसार तासिका तत्त्वावर उच्च पदवीधारक NET/SET, PhD. प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात येते.**

## शिक्षकेतर कर्मचारी वर्ग (Non-teaching Staff)

| अ.क्र. | नाव | अ.क्र. | नाव |
|---|---|---|---|
| १) | श्री. एस. के. कोकेवार | २) | श्री. एस. व्ही. शिंदे |
| ३) | श्री. ए. एम. पिल्लेवार | ४) | श्री. डी. यू. वाडेकर |
| ५) | श्री. एस. पी. ढाकुलकर | ६) | श्री. व्ही. आर. ठाकूर |
| ७) | श्री. एस. बी. वानखडे | ८) | श्री. एन.के लावरे |





**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना :**

- विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने ठरवून दिलेला गणवेश परिधान करुन येणे अनिवार्य असून सोबत ओळखपत्र जवळ बाळगणे आवश्यक आहे.
- महाविद्यालयात दैनंदिन राष्ट्रगीत घेण्यात येईल.

**प्रवेश पद्धती :**

- महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी प्रथम महाविद्यालयाच्या साइटवर अर्ज भरावा अथवा कार्यालयातून माहितीपत्रक व प्रवेश अर्जाचा छापील नमुना घ्यावा.
- प्रवेश अर्ज सुवाच्च अक्षरात भरुन कार्यालयात आवश्यक त्या प्रमाणपत्रासह सादर करावेत.
- स्कॉलरशिप (ई.बी.सी., पी.टी.सी., एस.टी.सी., फ्री शीप सवलतीचे अर्ज) संलग्न विभागास ऑनलाईन सादर करावेत.

**प्रवेश अर्जासोबत जोडावयाची आवश्यक प्रमाणपत्र :**

- शालांत परीक्षेचे (१० वी) उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रिकेच्या व टी.सी.च्या दोन झेरॉक्स.
- १२ वी (एच.एस.सी.) उत्तीर्ण झाल्याची मुळ गुणपत्रिका व त्यांच्या दोन झेरॉक्स.
- शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र (टी.सी.) व त्याच्या दोन झेरॉक्स.
- आधारकार्ड दोन झेरॉक्स
- जात प्रमाणपत्र दोन झेरॉक्स
- पासपोर्ट साईज दोन फोटो.
- बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स

**महाविद्यालयीन प्रवेश फी :**

- शासनाचे **नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती** द्वारे **प्राप्त निर्देशाप्रमाणे** महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी प्रवेश फी आकारल्या जाईल.

**विद्यापीठाच्या परीक्षेचा फॉर्म भरण्याची पद्धत :**

- विद्यापीठाच्या परीक्षेचा फॉर्म भरण्यासंबंधी सूचना वेळोवेळी महाविद्यालयाच्या

सूचना फलकावर लावण्यात येईल. त्या सुचनांचे पालन करुन विद्यापीठाच्या नियमानुसार परीक्षेचे फॉर्म विद्यार्थ्यांनी भरणे अपेक्षित आहे.

**शिष्यवृत्ती :**

- समाजकल्याण कार्यालयाकडून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांच्या खात्यात परस्पर जमा केल्या जाईल.
- दुसऱ्या महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मंजुरी क्रमांक आणणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयीन ग्रंथालयाचा लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा याकरिता खालील सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.**

**ग्रंथालयाचा ई मेल : smdbharatilibrary@gmail.com)**

- महाविद्यालयात संगणकीकृत सुसज्ज ग्रंथालय उपलब्ध आहे. ग्रंथालयातील सर्व अडचणीबाबत ग्रंथालय विभाग प्रमुखांशी (लायब्ररीयन) संपर्क साधावा.
- माहिती पत्रासोबत जोडलेले अर्ज भरुन ग्रंथालयाचे सभासद व्हावे.
- प्रत्येक सभासद विद्यार्थ्याला सभासद तिकीट (बि.टी) देण्यात येईल. एका विद्यार्थ्यास एक पुस्तक देण्यात येईल.
- आपले सभासद तिकीट हरविल्यास त्याची माहिती त्वरीत लेखी स्वरुपात द्यावी, त्याबद्दल सभासद व्यक्तिश: जबाबदार राहील. २०/- रु. दंड भरल्यास दुसरे तिकीट मिळू शकेल. सभासद तिकीटाशिवाय ग्रंथ मिळणार नाही याची नोंद घ्यावी.
- प्रत्येक विद्यार्थी हा त्याच्या सभासद तिकीट व ओळखपत्रासाठी व्यक्तिश: जबाबदार राहील. त्या तिकीटाचा कोणताही दुरुपयोग करुन त्यावर ग्रंथ नेला तर त्याची जबाबदारी सभासदावर राहील व त्यामुळे ग्रंथालयाचे काही नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन द्यावी लागेल. विद्यार्थ्याचे नावावर असलेले ग्रंथ फाटल्यास अथवा गहाळ झाल्यास त्या ग्रंथाची पूर्ण किंमत भरावी लागेल.
- घरी वाचावयास दिलेले ग्रंथ मुदतीत (जी दिनांक चिठ्ठीवर लिहिली असेल) परत केले पाहिजे. ग्रंथ परत करण्यास उशिर झाला तर दर दिवसाला १ रु. प्रमाणे दंड द्यावा लागेल.





- वाचन कक्षात शांतता राखणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने वाचन कक्ष सोडण्यापूर्वी आपल्या जवळील ग्रंथ, मासिक व नियतकालिके परत करावी, ग्रंथालयाबाहेर कोणतेही वाचन साहित्य नेता येणार नाही.
- प्रत्येक विद्यार्थ्याने ग्रंथालयाचा सभासद होणे आवश्यक आहे.
- परीक्षा सुरु होण्याच्या दहा दिवस आधी विद्यार्थ्यांनी पुस्तक परत करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या कालावधीत पुस्तके ठेवायची असतील त्यांनी पुस्तकाचे किंमती इतके डिपॉझिट भरल्यास त्यांना परवानगी देण्यात येईल.

## शारीरिक शिक्षण व खेळ

- विद्यार्थ्याला वेळापत्रकाप्रमाणे भरणाऱ्या प्रशिक्षण व श्रमदान वर्गात उपस्थित राहावे लागेल.
- शा. शि. तासांना विद्यार्थ्यांना उपस्थित राहावे लागेल.
- महाविद्यालयाचे आवारात प्रॅक्टिस करणाऱ्यांना खेळात घेतले आहे.
- महाविद्यालयाचे खेळाचे सामान सुस्थितीत परत करणे आवश्यक आहे.
- कोणत्याही टिमचा कप्तान नेमण्याचा तसेच इतर आनुषांगीक बाबींचा अंतिम अधिकार शा.शि. संचालक यांचेकडे राहील.
- खेळाकरिता अथवा इतर कार्यक्रमात भाग घेण्याकरिता महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनना बाहेरगावी जाण्याकरिता देण्यात येणाऱ्या खर्चाचा हिशेब महाविद्यालयाचे नियमानुसार करण्यात येईल.

## विद्यापीठ विद्यार्थी परिषद

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी आणि अधिक चांगल्या सामुदायिक जीवनासाठी पाठेत्तर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता विद्यार्थी परिषदेचे गठन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या तरतुदीप्रमाणे करण्यात येईल.

## सांस्कृतिक कार्यक्रम विभाग

सांस्कृतिक कार्यक्रम विभागातील उपक्रमासाठी प्रभारी प्राध्यापक महाविद्यालयातून प्रवेशित विद्यार्थ्यांची निवड करतील व ज्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे त्यांना नियमित प्रॅक्टीस करावी लागेल.

## Women Grievance Redressal Cell
## (महिला तक्रार निवारण समिती)

महाविद्यालयीन परिसरात कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण मिळावे, महिला कर्मचाऱ्यांना किंवा विद्यार्थीनींना सुरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणे यासाठी 'कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ' (प्रतिबंध, मनाई आणि तक्रार निवारण) कायदा २०१३ या कायद्याअन्वये महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.

## परिमल वार्षिकांक (मॅगझिन)

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या लेखनविषयक कलागुणांना वाव मिळावा, त्यांना आपले विचार, लेख, कविता इ. माध्यमातून व्यक्त करण्याची संधी मिळावी म्हणून दरवर्षी महाविद्यालयातर्फे 'परिमल' वार्षिकांक प्रकाशित करण्यात येतो. प्राध्यापक समिती (संपादक निवड मंडळ) ही संपादकांची नेमणूक करतील. मॅगझिन हा विषय विद्यार्थ्यांच्या अधिकाराखाली येणार नाही. वार्षिक अंकाचे प्रकाशन साधारणतः फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात करुन उन्हाळ्यात मासिकाचे वाटप होईल.

## स्पर्धात्मक परिक्षा

एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. बौद्धिक क्षमता यासारख्या स्पर्धात्मक परीक्षेचे नियिमत वर्ग व सराव परीक्षांचे आयोजन केले जाते. सविस्तर माहितीसाठी ग्रंथालयात संपर्क साधावा.

## राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयीन विद्यार्थी/विद्यार्थीनींमध्ये सामाजिक जागरुकता निर्माण व्हावी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत विविध उपक्रम राबिवले जातात. रक्तदान शिबिरे, श्रमदान शिबिरे, एड्स जनजागृती, मतदार नोंदणी अशा अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या माध्यमातून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविणे हे उद्दिष्ट साधता येते. इच्छूक विद्यार्थ्यांनी या रा.से.यो. पथकात सहभाग नोंदवावा.

## ओळखपत्र

महाविद्यालयात प्रवेश मिळताच विद्यार्थ्यांस ओळखपत्र दिली जातील. ग्रंथालय, वाचनकक्ष, वर्ग, स्नेहसंमेलनाचे कार्यक्रम व महाविद्यालयीन व इतर कार्यक्रम अशा





ठिकाणी प्रवेश मिळण्याकरिता व इतर वेळीही स्वतःच्या सोयीसाठी हे ओळखपत्र विद्यार्थ्यांनी सतत सोबत बाळगणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्याजवळ ओळखपत्र नसेल त्यांना वर्गात, खेळात तसेच महाविद्यालयीन कार्यक्रमात भाग घेता येणार नाही.

**शिस्त समितीच्या शिफारसीने पुढील कारणास्तव विद्यार्थ्यांची नावे काढून टाकण्याचा अधिकार प्राचार्यांना राहील.**

- महाविद्यालयाची फी न भरल्यास
- शैक्षणिक योग्यतेची पूर्तता न केल्यास.
- प्राचार्यांच्या मतानुसार वर्तणूक असमाधानकारक असल्यास किंवा संस्थेला बदनामकारक असा उच्चार किंवा वर्तन केल्यास गैरशिस्तीचे व बेजबाबदारपणाचे वर्तन केल्यास.
- मोर्चा, संप, अन्य राजकीय आंदोलनाचे, हिंसक कृत्ये, रॅगिंग, मुलींशी असभ्य वागणूक इ. प्रकारात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे काटेकोरपणे लक्ष पुरिवण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या दृष्टीने प्रयत्न केले जातात. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त हे महाविद्यालय विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आणि जबाबदारीची योग्य जाणीव व्हावी याकडे खास लक्ष पुरिवते. भारतीय विद्यार्थ्याने जबाबदार व सुसंस्कृत नागरीकात रुपांतर करतांना कोठेही कसर राहू नये याकरिता महाविद्यालय सदैव दक्ष असते.

स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करुन त्यांना महाविद्यालयीन जीवनात येणाऱ्या अडचणींचे निवारण करण्याचे तसेच त्यांच्या भावी आयुष्याचा मार्ग सुकर करुन देण्याचे आश्वासन देते.

## मतदार नोंदणी

ज्या विद्यार्थ्याचे वय १८ वर्षाचे वर आहे त्या विद्यार्थ्याने मतदार यादीमध्ये नाव नोंद करुन मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.

### महाविद्यालयाद्वारे चालविण्यात येणारे अल्पकालिन कोर्सेस *(Short Term Courses)*

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रमाचा कालावधी |
|---|---|---|
| 1. | Certificate Course in Tally | 3 Months |
| 2. | Certificate Course in English Communication for Workplace and Business | 3 Months |
| 3. | Certificate Course in Medicinal Plants: Traditional Uses and Career Opportunities | 3 Months |
| 4. | Certificate Course in Event Hosting and Compering | 3 Months |

### महाविद्यालयाचे अद्ययावत संशोधन केंद्र

| Sr.No. | Ph.D Research Center of Subjects |
|---|---|
| 1. | Economics |
| 2. | Zoology |
| 3. | Botany |
| 4. | Physics |

### आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

| Sr.No. | संभाव्य अभ्यासक्रम |
|---|---|
| 1. | Junior Software Developers |
| 2. | I.T. Coordinators of School |

### यशवंतराव चव्हाण माराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक चे अभ्यासकेंद्र

| केंद्राचे नांव : श्री महंत रामभारती महाविद्यालय, आर्णी, जि.यवतमाळ | |
|---|---|
| केंद्र क्रमांक : 1418A | |
| अ.क्र. | पदवी उपक्रम |
| १ | बी.ए. |
| २ | बी.कॉम. |





**महाविद्यालयाद्वारे राबविण्यात येणारा विशेष उपक्रम**

## करिअर कट्टा

विद्यार्थी नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन कोर्सेससाठी खालील लिंकवर जाऊन नोंदणी करा.

**https://play.google.com/store/apps/details?id=com.mitsct**

## करिअर कट्टा

**-: विद्यार्थ्यांसाठी माहितीपत्रक :-**

| महिना | आयएएस आपल्या भेटीला सायंकाळी ६ ते ७ वा. | उद्योजक आपल्या भेटीला सायंकाळी ७ ते ८ वा. |
|---|---|---|
| मार्च<br>एप्रिल<br>मे | ❊ राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा<br>❊ महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>❊ पोलीस भरती | ❊ उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास |
| जुन<br>जुलै<br>ऑगस्ट | ❊ बँकींग सेवा<br>❊ बँकींग सेवा | ❊ व्यवस्थापकीय कौशल्य व प्रत्यक्ष उद्योजकांचे मार्गदर्शन |
| सप्टेंबर<br>ऑक्टोंबर<br>नोव्हेंबर | ❊ स्टाफ सिलेक्शन कमिशन | ❊ वित्त व्यवस्थापन<br>❊ निर्णय क्षमता<br>❊ जोखीम व्यवस्थापन (Risk Management) |
| डिसेंबर<br>जानेवारी<br>फेब्रुवारी | ❊ केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षा (यु.पी.एस.सी.) | ❊ मनुष्यबळ व साधनसामग्री<br>❊ आधुनिक तंत्रज्ञान |

(YouTube, Facebook live)
सायंकाळी ०६ ते ७.३०
दर शनिवार : प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत चर्चा
दर रविवार : उद्योजकांसोबत चर्चा

यासोबत सभासद शुल्क रु.३६५/- भरल्यानंतर विद्यार्थ्यांना ३ वर्षे, प्रतिवर्षी ५ या पद्धतीने १५ कोर्सेस मोफत दिले जातील.

SCAN ME

अधिक माहितीसाठी व कोर्सेसची यादी पाहणेसाठी
https://careerkatta.mltac.co.in या लिंकवर भेट द्यावी.
संपर्क : **प्रा. डॉ. पी. एम. वानखडे, ८८०५२९२८८३**

# ग्रंथालय सभासद अर्ज

विद्यार्थ्यांने फोटो चिकटवू नये फक्त स्टेपल करा.

**मा. ग्रंथालय विभाग प्रमुख,**
**स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व**
**श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय,**
**आर्णी, जि. यवतमाळ**

महोदय,

मी आपल्या महाविद्यालयात सन २०   – २०   या शैक्षणिक सत्रात प्रवेश घेतला असून माझी माहिती खालीलप्रमाणे –

पूर्ण नांव ____________________

वर्ग ____________________ शाखा – कला/ वाणिज्य / विज्ञान

मो.नं. ____________________ व्हॉट्सअप क्र. ____________________

ई–मेल ____________________

कायमचा पत्ता ____________________

____________________

स्थानिक पत्ता ____________________

____________________

**प्रतिज्ञापत्र**

मला आपल्या ग्रंथालयाचे सभासद व्हायचे असून वर दिलेली माहिती खरी आहे. मला ग्रंथालयाचे सर्व अटी व नियम मान्य असून माझ्याकडून नियमभंग झाल्यास होणारी दंडात्मक कार्यवाही मला मान्य राहील.

विद्यार्थ्यांची स्वाक्षरी

# स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय,
## आर्णी, जि. यवतमाळ

## प्रवेश आवेदन पत्र

अनु.क्र.

विद्यार्थ्याचा फोटो

शाखा :- कला / वाणिज्य / विज्ञान

प्रवेश क्रमांक :- ____________

वर्ग :- ____________

दिनांक :- ____________

प्राचार्य महोदय,

मी शैक्षणिक वर्ष २० - २० मध्ये वरिष्ठ महाविद्यालयाच्या वर्गामध्ये प्रवेश घेऊ इच्छितो. माझी आवश्यक माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) पूर्ण नांव :- ____________

२) जात :- ____________

३) वडिलाचे पूर्ण नांव :- ____________

४) आईचे नांव :- ____________

५) पालकाचे पूर्ण नांव :- ____________

६) स्थायी पूर्ण पत्ता :- ____________

मो.क्र.................................... व्हॉट्स अप क्र......................................

मेल आय.डी. ____________

आधार क्रमांक :____________ बँक पासबुक क्रमांक : ____________

७) वडिलांचा व्यवसाय :- ____________

८) वार्षिक उत्पन्न :- ____________

९) शैक्षणिक सवलतीचा प्रकार :- ____________

ई. बी. सी. शिष्यवृत्ती धारक :- ____________

पूर्ण फी धारक :- ____________

एक वेळा नापास झालेला :- ____________

१०) या महाविद्यालयात प्रथम प्रवेश घेण्याचे वर्ष :- ____________

११) विवाहीत / अविवाहीत :- ____________

१२) ग्रामीण / शहरी भागात राहणारा :- ____________

१३) पात्रता परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दलची माहिती :- ____________

अ) पात्रता परीक्षेचे नांव :- ____________

ब) परीक्षा बोर्ड / विद्यापीठाचे नांव :- ____________

क) पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष :- ____________

ड) परीक्षा केंद्र :- ____________

ई) केंद्र क्रमांक :- ____________

उ) विद्यापीठ नामांकन क्रमांक :- ____________

ऊ) श्रेणी गुणांचे प्रमाण :- ____________

ए) घेतलेले विषय (१२ वी H.S.C.)

_______________________________________________

_______________________________________________

१४) यावर्षी खालील विषयांचा अभ्यास करावयाचा आहे.

**टिप : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विषयांची निवड करता येईल.**

१) ____________ २) ____________ ३) ____________

४) ____________ ५) ____________ ६) ____________

७) ____________ ८) ____________ ९) ____________

१५) मी प्रतिज्ञापूर्वक कळवितो की, या अर्जात लिहिलेली माहिती बरोबर आहे. महाविद्यालयाचे प्रचलित नियम अधिनियम तसेच महाविद्यालयातर्फे प्रशासन संबंधी यापुढे केले जाणारे नियम आणि अधिनियम मला बंधनकारक राहतील. जोपर्यंत मी कॉलेजचा विद्यार्थी असेल तो पावेतो कॉलेजमध्ये तसेच बाहेरसुध्दा कॉलेजच्या प्रशासनाला अगर शिस्तीला बाधक ठरणारे वर्तन मी कदापिही करणार नाही. बेशिस्त वर्तन केल्यास कॉलेजच्या प्रशासन अधिकाऱ्याने केलेली शिक्षा मला बंधनकारक राहील.

**तारीख :–** **विद्यार्थ्याची सही**

१६) मी प्रतिज्ञापूर्वक मान्य करतो की, अर्जदार माझा मुलगा / मुलगी / पाल्य आहे. या अर्जात त्याने दिलेली माहिती बरोबर आहे. माझा मुलगा / मुलगी / पाल्य तर्फे मी स्वत: जबाबदार आहे. तसेच माझ्या पाल्यावर बेशिस्त वर्तनाबद्दल जी कार्यवाही केली जाईल ती मला मान्य राहील.

**तारीख :–** **वडिलांची/ पालकांची सही**

१७) **प्रवेश अर्ज तपासला, बरोबर आहे.**

**प्रवेश देण्यास अर्ज सादर.**

**प्रवेश समिती सदस्याची सही** **प्राचार्य सही**

**आवश्यक कागदपत्रे :**

- १२ वी (एच.एस.सी.) उत्तीर्ण झाल्याची मुळ गुणपत्रिका व त्यांच्या दोन झेरॉक्स.
- शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे मूळ प्रमाणपत्र (टी.सी.) व त्याच्या दोन झेरॉक्स.
- शालांत परीक्षेचे (१० वी) उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रिकेच्या व टी.सी.च्या दोन झेरॉक्स.
- आधारकार्ड दोन झेरॉक्स
- जात प्रमाणपत्र दोन झेरॉक्स
- पासपोर्ट साईज दोन फोटो.
- बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स

**तारीख :** **प्रवेश लिपीक**